# अभीप्सा

अखिल भारतीय पत्रिका

जुलै २०२४

वर्ष ४९ अंक ०७

## साधेपणा





श्रीमाताजी

# अभीप्सा

(ईश्वराप्रति असलेली आस)

**प्रकृती ती जड । करील उघड । ईश्वरी ते रूप । सुघटित ।।**

---


**प्रकाशक**

श्री. प्रदीप नारंग, पुडुचेरी

**प्रकाशन स्थळ**

श्रीअरविंद सोसायटी

सोसायटी हाऊस, ११ सेंट मार्टिन स्ट्रीट, पुडुचेरी – ६०५००१



**संपादक**

डॉ. केतकी मोडक, पुणे

भ्रमणध्वनी : ९४२१०१६०८९

ई–मेल : editorabhipsa2018@gmail.com



**मुद्रक**

सेन्थिल ऑण्डवर प्रेस, पुडुचेरी – ६०५००१


**चिंतनार्थ...**

साधक : श्रीमाताजींबरोबरचे आमचे खरे नाते कोणते? माता आणि बालकाचे नाते हेच खरे नाते असते ना?

श्रीअरविंद : एखादे बालक मातेवर ज्याप्रमाणे संपूर्णतया, प्रामाणिकपणे आणि साध्यासुध्या विश्वासाने, प्रेमाने विसंबून असते ते तसे नाते हेच श्रीमाताजींबरोबर असलेले खरे नाते असते.

– श्रीअरविंद (CWSA 32 : 448)

*

# साधेपणा

संपादकीय........................................................०२
साधेसरळ जीवन..................................................०३
साधकाचे जीवन..................................................१२
आनंदमय जीवन..................................................१७
श्रीअरविंद लिखित पत्रांमधून....................................२५
आनंददायक सहजता..............................................३२

---

## संपादकीय

सहजस्वाभाविकतेमध्ये एक महान सौंदर्य दडलेले असते. प्रकृतीद्वारे करण्यात आलेल्या सुरुवातीच्या निर्मितीमध्ये हे सौंदर्य आपल्याला स्पष्टपणे पाहायला मिळते. परंतु उत्क्रांती जसजशी अधिकाधिक प्रगत होत गेली तसतशी मनोमय मनुष्याच्या उदयाबरोबर जटिलता वाढीस लागली आणि सहजस्वाभाविकता हरवून गेली. आता आपण अशा एका चौरस्त्यावर आलो आहोत की जेथे जटिलतेने स्वतःहून दिव्य सहजस्वाभाविकतेस वाट करून दिली पाहिजे.

साधेपणा, सहजस्वाभाविकता या अतिशय महत्त्वाच्या पण दुर्मिळ गुणाला 'अभीप्सा' मासिकाचा हा अंक वाहिलेला आहे.

संपादक, अभीप्सा मासिक

**

---

अभीप्सा मासिक हे श्रीअरविंद सोसायटी, पाँडिचेरीचे मुखपत्र आहे.

---

योगी श्रीअरविंद म्हणजे पूर्वाश्रमीचे क्रांतिकारक अरविंद घोष आणि श्रीमाताजी म्हणजे पूर्वाश्रमीच्या मीरा अल्फासा, (फ्रान्स). 'श्रीअरविंद आश्रम' हा भारताच्या पूर्व किनाऱ्यावर पाँडिचेरी येथे आहे.

# साधेसरळ जीवन

## सदाचाराचा हेतू

तुम्ही जर सरळ मार्गाचा अवलंब करू पाहात असाल, तुम्ही विनम्र असाल, तुम्ही शुद्धतेसाठी प्रयत्नशील असाल, जर तुम्ही निरपेक्ष असाल, तुम्हाला एकांतवासाचे जीवन जगायचे असेल, तुम्हाला विवेकपूर्ण जीवन जगायचे असेल तर त्यामुळे तुमचा मार्ग सुकर होईल, गोष्टी सोप्या होतील या भ्रमात तुम्ही राहता उपयोगी नाही, किंवा त्या भ्रमास खतपाणीही घालता कामा नये...

खरेतर परिस्थिती याच्या अगदी उलट असते.

जेव्हा तुम्ही आंतरिक व बाह्य पूर्णत्वाच्या दिशेने वाटचाल करू लागता, त्याचवेळी एकदम सर्व अडचणी यायला सुरुवात होते. मी अनेकदा लोकांना असे बोलताना ऐकले आहे की, ''काय हे? मी आत्ता कुठे जरा चांगले वागायचा प्रयत्न करतो आहे तर, प्रत्येकजण माझ्याशी वाईटच वागतोय.'' पण हे असे का घडते? व्यक्तीने चांगले वागताना कोणताही अंतःस्थ हेतू ठेवू नये, ही शिकवण तुम्हाला देण्यासाठीच ते घडत असते. म्हणजे असे की, इतरांनी तुमच्याशी चांगले वागावे म्हणून केवळ तुम्ही त्यांच्याशी चांगले वागायचे, असे नाही तर, व्यक्तीने चांगले असण्यासाठीच चांगले वागले पाहिजे.

नेहमीसाठी तोच धडा आहे. व्यक्तीने जितके काही चांगले, जितके काही उत्तम करता येईल तेवढे करावे, परंतु फळाची अपेक्षा बाळगू नये, परिणाम दिसावेत म्हणून काही करू नये. म्हणजे, चांगल्या कृतीसाठी, सत्कार्यासाठी काहीतरी बक्षिसाची अपेक्षा बाळगायची, जीवन सुखकर व्हावे म्हणून चांगले वागायचे, या अशा दृष्टिकोनामुळेच सत्कार्याची किंमत नाहीशी होऊन जाते. चांगुलपणाबद्दलच्या प्रेमापोटीच तुम्ही चांगले असले पाहिजे, न्यायाच्या प्रेमापोटी तुम्ही न्यायी असले पाहिजे; पावित्र्याच्या, शुद्धतेच्या प्रेमापोटीच तुम्ही पवित्र व शुद्ध असले पाहिजे

आणि निरपेक्षतेवरच्या प्रेमापोटीच निरपेक्ष असले पाहिजे, तरच तुम्ही मार्गावर प्रगत होण्याची खात्री बाळगू शकता.

– श्रीमाताजी (CWM 03 : 264-265)

*

## रिकाम्या वेळेचा सदुपयोग

जीवनामध्ये कित्येक वेळा एक प्रकारचे रिकामपण जाणवते, कधी एखादा रिकामा क्षण, किंवा काही मिनिटे, किंवा कधीकधी त्याहूनही अधिक वेळ मिळतो. अशा वेळी तुम्ही काय करता? तुम्ही स्वतःचे लक्ष लगेचच दुसरीकडे कोठेतरी वळविण्याचा प्रयत्न करता आणि वेळ जाण्यासाठी मूर्खपणाच्या या नाही तर त्या गोष्टी शोधून काढता. ही अगदी सार्वत्रिक बाब आहे. लहानमोठे सारेच जण कंटाळा येऊ नये म्हणून, काही ना काही तरी करत राहण्यात वेळ घालवितात. कंटाळा या गोष्टीचा त्यांना सर्वात जास्त तिटकारा असतो आणि त्या कंटाळ्यापासून सुटका करून घेण्याचा त्यांचा मार्ग म्हणजे मूर्खपणाच्या गोष्टी करत राहणे हा असतो.

पण कंटाळ्यापासून सुटका करून घेण्याचा एक अधिक चांगला मार्ग आहे. तो म्हणजे पुढील गोष्टी लक्षात ठेवायच्या – जेव्हा तुम्हाला थोडा रिकामा वेळ मिळतो, एक तास असो किंवा काही मिनिटे असोत, तेव्हा स्वतःला सांगा, ''निदान आता तरी मला काही वेळ एकाग्र होण्यासाठी, विखुरलेल्या 'मी'चे एकत्रीकरण करण्यासाठी, जीवनाचे प्रयोजन जगण्यासाठी, सत्य आणि शाश्वताप्रत स्वतःला समर्पित करण्यासाठी मिळाला आहे.'' तुम्ही जेव्हा बाह्य परिस्थितीने गांजलेले नसता तेव्हा, त्या प्रत्येक वेळी तुम्ही जर अशा गोष्टी केल्यात तर, तुम्ही या (योग)मार्गावर वेगाने प्रगती करत आहात, असे तुम्हाला आढळेल.

वायफळ गप्पांमध्ये, निरुपयोगी गोष्टींमध्ये, तुमची चेतना ज्यामुळे निम्न पातळीवर उतरते अशा गोष्टींचे वाचन करण्यामध्ये तुमचा वेळ

नमस्कार वाचकहो,

अभीप्सा मासिकातील काही पाने आपल्या अवलोकनार्थ येथे देण्यात आली होती. आपल्याला ह्या अंकातील विषयावरील आणि यासारख्या इतर विषयांवरील श्रीअरविंद आणि श्रीमाताजी यांचे विचार मराठीत समजून घ्यावयाचे असतील तर, आपण अभीप्सा मासिकाचे वर्गणीदार व्हावे, ही विनंती.

वर्गणीचा तपशील शेजारील पानावर दिला आहे.

– संपादक, अभीप्सा मासिक

## मासिकाचे स्वरूप

श्रीअरविंदांचे बहुतांशी सारे साहित्य मुळात इंग्रजी व बंगाली भाषेत आहे. तर श्रीमाताजी यांचे बहुतांशी वाङ्मय फ्रेंच व इंग्रजी भाषेत आहे. हे दुर्मिळ विचारधन मराठीत आणण्याचे प्रयत्न 'अभीप्सा' या मासिकाच्या माध्यमातून अव्याहतपणे चालू आहेत. पाँडिचेरीहून प्रकाशित होणाऱ्या श्रीअरविंद सोसायटीचे मुखपत्र असलेल्या 'ऑल इंडिया मॅगेझिन' या इंग्रजी मासिकाची मराठी आवृत्ती म्हणजे 'अभीप्सा.' १९७६ पासून हे मासिक नियमितपणे प्रकाशित होत आहे.

### वर्गणी व देणगीचा तपशील

वार्षिक वर्गणी : २०० रू. (१२ अंक)

तीन वर्षाचे दर : ५८० रू. (३६ अंक)

पाच वर्षांचे दर : ९६० रू. (६० अंक)

देणगीदार : ४००० रू.

(देणग्या 80 G अंतर्गत करसवलतीस पात्र आहेत.)

वर्गणी वा देणगीची रक्कम आपण ऑनलाईनदेखील भरू शकता.

### वर्गणी वा देणगी ऑनलाईन भरण्यासाठी बँकेचा तपशील

खातेदाराचे नाव : Sri Aurobindo Society

बँकेचे नाव : Central Bank of India

IFSC Code : CBIN0281354

A/C No. : 1235467709

*

**सूचना :** रक्कम भरल्याची पोहोचपावती व आपला संपूर्ण पत्ता membership@aurosociety.org आणि editorabhipsa2018@gmail.com या ईमेल आयडीवर पाठवावा ही विनंती; म्हणजे आपल्या पत्त्यावर अंक पाठवता येईल.

*

वर्गणीदारांना काही कारणाने अंक उपलब्ध न झाल्यास पुढील क्रमांकावर संपर्क करावा – श्री. गोविंद पोतदार ९३७३७२४५२०

# बालकाचा निरागस भाव

## (श्रीमाताजींनी सांगितलेली ही कथा)

फ्रान्समधील एका खेडेगावात तेरा-चौदा वर्षांचा एक मुलगा दारोदार हिंडत होता. रात्रीच्या कडाक्याच्या थंडीत कोणी आसरा देईल का हे तो शोधत होता. तो एक अतिशय गुणी मुलगा होता. त्याच्या वडिलांची सर्कस होती. आणि त्यामध्ये तो विविध कसरती करून, लोकांचे मनोरंजन करत असे. परंतु नुकतेच त्याच्या वडिलांचे निधन झाले होते आणि आता तो निराधार, बेघर झाला होता. या परिस्थितीमध्येही तो रस्त्यावर आपली कला दाखवून, रोजीरोटी कमवत असे. पण आता सर्वत्र बर्फवृष्टी होत असल्याने, कोणीच घराबाहेर पडत नव्हते आणि त्यामुळे त्याला दोन वेळच्या अन्नाचीही भ्रांत निर्माण झाली होती. आसरा शोधत शोधत तो एका मठापाशी येऊन पोहोचला. त्या मठाधिपतीने त्याला आसरा दिला. त्याने त्या मुलाची सगळी कहाणी ऐकून घेतली. आणि त्या मुलास सांगितले, ''तुझी इच्छा असेल तर तू इथे कायमचा राहू शकतोस.''

मुलगा आनंदी झाला. पडेल ते काम करून, तो तेथेच राहू लागला. लवकरच त्याने तेथील सर्वांची मने जिंकली. परंतु या मुलाच्या मनात विचार येऊ लागले, ''येथील सर्व साधक रोज अभ्यास करतात, प्रार्थना करतात, साधना करतात परंतु मी तर तसे काहीच करू शकत नाही. मग मला देवीमाता कशी बरे प्रसन्न होणार?'' परंतु लवकरच त्यावर त्याला एक उपाय सापडला.

तो देवीमातेला म्हणाला, ''आई, मला या लोकांसारखी साधना करता येत नाही. परंतु मला ज्या कसरती करता येतात त्या मी तुला दाखवत जाईन. आज मी तुला एक नवीन कसरत दाखवितो, तुला ती आवडते की नाही सांग.'' त्याने एक कसरत करून दाखविली. आणि तेव्हाच मूर्तीमधून ती देवीमाता प्रकट झाली आणि म्हणाली, ''बाळा, तुझा हा खेळ मला खूप आवडला. रोज मला असाच एक नवीन खेळ दाखवत जा. मी तुझ्यावर प्रसन्न आहे.'' असे म्हणून ती अंतर्धान पावली.

हा सारा प्रसंग तो मठाधिपती पाहत होता आणि तेव्हा तो स्वतःच्या मनाशी म्हणाला, ''बालकाचा निरागस भाव, त्याचा साधेपणा ईश्वराला भावतो, हेच खरंय.''

– आधारित (Learning with the Mother by Tara Jauhar)

*

## आजवर दर्शनदिनी देण्यात आलेले संदेश (क्रमशः)

### २४ एप्रिल २००२

व्यक्तीने श्रीमाताजींच्या 'शक्ती'ची आळवणी केली पाहिजे ; अगदी अमुक एखाद्या क्षणी आपण त्या 'शक्ती'प्रत खुले नाही आहोत, असे व्यक्तीला जाणवले तरीही तिने श्रीमाताजींच्या 'शक्ती'ची आळवणी केली पाहिजे. बरेचदा, आळवणी केल्यामुळे उन्मुखता येते, खुलेपणा येतो आणि त्याच बरोबर 'शक्ती'चे आगमनदेखील होते.

– श्रीअरविंद

*

### १५ ऑगस्ट २००२

माणसांना केवळ त्यांच्या स्वतःच्या क्षमतांवरच विसंबून राहावे लागावे अशा युगामध्ये आपण आत्ता निश्चितच वावरत नाही आहोत. त्यांचे प्रबोधन करण्यासाठी 'ईश्वरा'ने 'त्याची स्वतःची चेतना' खाली पाठविली आहे. ज्यांना शक्य आहे त्या सर्वांनी या संधीचा लाभ घेतला पाहिजे.

– श्रीमाताजी (CWM 15 : 67)

*

### १७ नोव्हेंबर २००२

अशी कोणीही व्यक्ती नाही की, जिला 'ईश्वराचा साक्षात्कार' करून घेणे अशक्य आहे. एवढेच की, काही जणांना त्यासाठी अनेकानेक जन्म लागतील ; तर काही जण या जन्मामध्येच ही गोष्ट साध्य करून घेतील. हा इच्छाशक्तीचा प्रश्न आहे. त्याची निवड करणे तुमच्या हाती आहे. परंतु मला हे सांगितलेच पाहिजे की, सद्यकालीन परिस्थिती ही त्यासाठी विशेष अनुकूल आहे.

– श्रीमाताजी (CWM 16 : 409)

*